**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416004 MAHARASHTRA**
**PHONE: EPABX 0231- 260900 FAX : 0091 - 2690655**
शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर –
Website : www.unishivaji.ac.in E – mail : exam.godown@unishivaji.ac.in
दुरध्वनी : परीक्षा गोडावून विभाग ०२३१ – २६०९३४५, २६०९११४

NACC 'A' Grade

Ref.No S.U./Exam Godown/133 Date :05/01/2018
संदर्भ क: शिवाजी वि/परीक्षा गोडावून /

प्रति,

1. मा. प्राचार्य,/संचालक,
   सर्व संलग्नित महाविद्यालये,
2. मा. अधिविभाग प्रमुख,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :– मार्च/एप्रिल 2018 परीक्षेसाठी आवश्यक उत्तरपत्रिका व इतर स्टेशनरीची (परीक्षा साहित्य) माहिती online पाठविणेबाबत.

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठ व महाविद्यालयीन पातळीवर :– मार्च/एप्रिल 2018 मध्ये होणा–या परीक्षेकरीता आपल्या महाविद्यालयासाठी आवश्यक को–या उत्तरपत्रिका (काळया व केशरी रंगाच्या) व इतर स्टेशनरीची मागणी आपल्या महाविद्यालयामार्फत करण्यात येते. सदर माहिती भरणेकरीता **http://online.shivajiuniversity.in/** या वेब पेजवर College/University portal या सदरात Stationary Demand Note या बटनाव्दारे तसेच http://ele2015.unishivaji.ac.in/Godown/CollegeLogin.aspx या लिंक मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. **University Exam व College Exam दोन्हीची माहिती भरल्यानंतर खात्रीकरून Confirm करावी.** तसेच Print Report वर मा. प्राचार्य यांची सही घेवून सदर कॉपी स्कॅन करून गोडावून विभागाच्या ई–मेलवर पाठवावी [E-mail- exam.godown@unishivaji.ac.in ]. उत्तरपत्रिका आणि स्टेशनरीची माहिती पाठवितांना खालील बाबींची पुर्तता करून दि. **16/01/2018 अखेर** माहिती online पाठवावी.

1. सदरची माहिती भरण्यासाठी महाविद्यालयानां Exam Forms भरणेसाठी देण्यात आलेला युजरनेम व पासवर्ड वापरता येईल.
2. उत्तरपत्रिका व स्टेशनरीची माहिती online पाठविल्यानंतरच आपणास स्टेशनरी उपलब्ध करून देण्यात येईल.
3. येणा–या परीक्षेसाठी लागणा–या उत्तरपत्रिका व स्टेशनरी मागणीसाठी आपले महाविद्यालयात असलेल्या एकुण शिल्लक स्टेशनरीमधून शिल्लक असणा–या उत्तरपत्रिका व स्टेशनरी वजा करून उर्वरीत उत्तरपत्रिका व स्टेशनरीची मागणी करावी. शिल्लक स्टेशनरी प्रथम वापरावी त्यानतरच नवीन स्टेशनरी वापरासाठी घ्यावी.

4. प्रात्यक्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका कागदी लखोटयातच देणेत याव्यात. त्याकरीता **कापडी पिशवी** वापरण्यात येऊ नये. (बरीच महाविद्यालये सदर सूचना देवूनही कागदी लखोटयात न देता कापडी पिशवीतून प्रात्यक्षिक साहित्य देतात. तरी प्रात्यक्षिक साहित्य हे कागदी लखोटयातून देणेत यावे.)
5. महाविद्यालयाकडून कापडी पिशव्या बाबत लेखी मागणी केलेनंतर शिल्लक असलेल्या प्रमाणात त्या देणेत येतील या करीता **तोंडी मागणी विचारात घेतली जाणार नाही**.
6. **उत्तरपत्रिकांच्या नोंदीसाठी वेगवेगळया नोंदवहया ठेवाव्यात.** उदा. उत्तरपत्रिका जमा खर्च नोंदवही, उत्तरपत्रिका ताब्यात दिल्याचे व परत मिळाल्याचे नोंदवही, सदर नोंदवहीवर दरदिवशीचा सुरवातीच्या शिल्लक उत्तरपत्रिकांची संख्या, दिवसभरामध्ये वापरलेल्या उत्तरपत्रिकांची संख्या व दिवसाअखेर वापरलेल्या व शिल्लक उत्तरपत्रिकेची संख्या यांचा तपशील नोंदवने आवश्यक आहे. **सदर तपशील महाविद्यालयाला भेट देणारे भरारी पथक, विशेष पथक, विद्यापीठीय अधिकारी यांना दाखविणे आवश्यक आहे.**
7. कंाहीवेळेला उत्तरपत्रिकांचा अनुकमांक व पाननंबर छपाई न झाल्याचे निदर्शनास आले आहे यासाठी **परीक्षा केंद्रांवरील ब्लॉकवर उत्तरपत्रिका देण्यापुर्वी त्यावरील अनुकमांक व पाननंबर परीक्षेपुर्वी तपासावेत** म्हणजे ऐनवेळी परीक्षा सुरू असतानां त्रास न होता परीक्षा सुरळीत पार पडतील.
8. परीक्षा संपल्यानंतर आपल्या केंद्रावर शिल्लक राहीलेल्या उत्तरपत्रिका व स्टेशनरी व्यवस्थित जतन करून ठेवाव्यात. सदर उत्तरपत्रिका व स्टेशनरी पुढील परीक्षेसाठी वापरावी.
9. विद्यापीठ परीक्षेसाठी मागणी केलेल्या को–या उत्तरपत्रिका व स्टेशनरी सध्या वापरात नसल्यास त्याची परस्पर विल्हेवाट न लावता विद्यापीठाकडे परत देणेसाठी लेखी कळवावे.
10. महाविद्यालयाने परीक्षेसाठी लागणा–या उत्तरपत्रिका आणि स्टेशनरी संख्येची **खात्री करून बिनचूक** मागणी करावी. मागणी आवश्यकतेपेक्षा खूपच कमी अथवा खूप जास्त असता कामा नये.
11. परीक्षा चालू असतांना वेळोवेळी शिल्लक स्टेशनरीचा आढावा घ्यावा. परीक्षेकरीता उत्तरपत्रिकेचा साठा कमी पडल्यास आपल्या महाविद्यालयाने विद्यापीठात **प्रत्यक्ष येवून स्टेशनरी घेवून जावी. त्याकरीता विद्यापीठाचे स्वतंत्र वाहन पाठविण्यात येणार नाही**.

अधिक माहितीकरीता खालील दुरध्वनी कमांकावर संपर्क साधावा.

- गोडावून विभाग (परीक्षा) अधिक्षक– 0231–2609114 / 2609345

तेव्हा वरील सूचना आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणाव्यात व मार्च/एप्रिल 2018 मध्ये होणा–या परीक्षेच्या आयोजनासाठी माहिती **दि. 16/01/2018** अखेर online पध्दतीने पाठविण्यात यावी. माहिती उपलब्ध न झाल्यास आपल्या महाविद्यालयाकडे **पुढील परीक्षा घेणेसाठी उत्तरपत्रिकांचा पुरेसा साठा शिल्लक आहे** असे गृहीत धरण्यात येईल याची नोंद घ्यावी ही विनंती कळावे.

आपला विश्वासू

PSPandi

उपकुलसचिव

(परीक्षा विभाग–पोस्टएक्झाम)